Publication: Punyanagari
Date: 23/8/2019
Page: 1
Column: 5-6

पुण्य नगरी
शुक्रवार
२३ ऑगस्ट २०१९

# दहिसरमध्ये अदानींचे जिनिअस पे किओस्क

**मुंबई** :अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबईने सुलभ बिल भरण्यासाठी दहिसरमधील शैलेंद्र एज्युकेशन सोसायटीजवळील अदानी रिसिव्हिंग केंद्रामध्ये चौथे स्वयंदेयक किओस्क जिनिअस पे सादर केले आहे.

ग्राहकांना अधिक काळ रांगांमध्ये उभे राहावे लागणार नसून धनादेश, रोख, डेबिट/क्रेडिट कार्ड्सच्या माध्यमातून देयके स्वीकारण्यात येणार आहेत. मुंबईत विविध ठिकाणी जिनिअस पे किओस्क स्थापन करण्यात येणार असून ग्राहकांना केवळ ५ मिनिटांच्या अंतरावर देयके भरता यावीत, हा यामागील उद्देश असणार आहे. ग्राहकांसाठी जिनिअस पे सेवा रोज सकाळी ७ ते रात्री ११ वाजेपर्यंत उपलब्ध असून या मशीनच्या माध्यमातून बिलांच्या प्रती प्राप्त करता येणार आहेत. अदानी इलेक्ट्रिसिटीने बिल भरण्याचा अनुभव स्मार्ट आणि सुलभ करण्यासाठी जिनिअस पे कि ओस्क यंत्रणा सादर करण्याचे ठरविले आहे. आघाडीची वीज वितरण कंपनी म्हणून ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्यासाठी तंत्रज्ञान सादर करण्यात प्रयत्नशील असल्याचे एईएमएलचे प्रवक्ते यांनी स्पष्ट केले आहे. या यंत्रणेसह एईएमएलने ग्राहक सेवा वाढविण्यासाठी चॅटबोट, व्हॉईसबोट, बिझनेससाठी व्हॉट्सअॅप आणि ऑटोमेटेड आयव्हीआर अशा उपयोगी सेवाही सादर केल्या आहेत.